प्रेसनोट

दिनांक १६/०३/२०२३

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, सिडको, नवी मुंबई कार्यालय येथील क्षेत्र अधिकारी यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचप्रत प्रतिबधंक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| ठाणे दैनंदिनी नोंद कमांक | :- | सीबीडी पो.स्टे. ठाणे दैनंदिनी नोंद कमांक २२ दि. १६/०३/२०२३ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | श्री मुकूंद चंद्रकांत बंडा (वर्ग २), वय ५७ वर्षे, क्षेत्र अधिकारी, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, सिडको, नवी मुंबई |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू. ७,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून पहिला हप्ता रू. ३,००,०००/- स्विकारणार असल्याचे निष्पन्न. |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू.३,००,०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ पुन:र्वसन मध्ये संपादित केलेल्या घराच्या बदल्यात सिडकोकडून मिळणा-या भुखंडाची पात्रता निश्चीत करण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्याकरीता मुख्य भुमि व भुमापन अधिकारी उमेश पोटे हे त्यांचे अधिनस्त कार्यालयीन अधिकारी श्री. मुकूंद बंडा व श्री. मनोज यांचे मार्फतीने रू.१५,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी दिनांक ०२/०३/२०२३ रोजी ॲसीबी, नवी मुंबई कार्यालयात तक्रार दिली होती.<br>प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०६/०३/२०२३, दिनांक १३/०३/२०२३ व दिनांक १४/०३/२०२३ रोजी शासकिय पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री. मुकूंद बंडा यांनी स्वत:साठी तसेच लोकसेवक श्री. मनोज पाटील व लोकसेवक श्री. सचिन वैती यांचेकरीता एकूण सात लाख रूपयांची मागणी करून पहिला हप्ता तीन लाख रूपये दि. १६/०३/२०२३ रोजी स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर दिनांक १६/०३/२०२३ रोजी लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान सिडको कार्यालय, नवी मुंबई येथे लोकसेवक श्री. मुकूंद बंडा यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रू.३,००,०००/- स्विकारले असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह १२:१८ वा. रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

**मार्गदर्शन अधिकारी :-मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री.अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**


संपर्क पत्ता :-ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१

संकेत स्थळ :-acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई-मेल :-spacbthane@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :-acbmaharashtra.net

टोलफ्रीनं. :-१०६४

दुरध्वनी क्र. :-०२२-२०८१३५९८/२०८१३५९९/२७८३३३४४

व्हॉटस्ॲप क्र. :-९९३०९९७७००

(ज्योती देशमुख)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई